# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१६५** **दिनांक - २९/०४/२०२४**

## कॅपिटल मॉल जवळ नालासोपारा पूर्व येथे कारवाई करुन अवैध्य वेश्याव्यवसाय करवुन घेणाऱ्या एक महीला आरोपीस अटक करुन तीन महीलांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश

आचोळे पोलीस ठाणे हद्दीतील “पंचकर्मा बॉडी केअर” शॉप नं.९,समर्पण सी एच एस, यशवंत विवा टाउनशिप, कॅपिटल मॉल जवळ नालासोपारा पूर्व याठीकाणी एक महीला वेश्यादलाल ही वेश्यागमनाकरीता मुली पुरवित असल्याची गोपनीय माहीती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार यांना मिळाल्यावरुन पोलीस पथक, बोगस गिऱ्हाईक व दोन पंच असे सदर ठिकाणी जावुन दि.२७/०४/२०२४ रोजी कारवाई करुन महीला वेश्यादलाल शबाना ऊर्फ सोनम शफीक शेख वय २४ वर्षे हीस अटक करुन तीन महीला पिडीतांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, बोगस गि-हाईक तयार करुन त्यास नमुद वेश्यादलाल हीचेकडे मिळालेल्या माहीतीच्या आधारे शबाना ऊर्फ सोनम शफीक शेख हीचे स्पामध्ये जावुन वेश्यागमनासाठी मुलीची मागणी केली असता तीने सांगितले की, मी एका मुलीचे मसाज व वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन ४०००/- रु. रु.घेते.आपणास कबुल असेल तर ४०००/-रु. देवुन तुम्ही येवू शकता असे सांगितल्यावर बोगस गि-हाईक याने तीस होकार दिला. त्यानंतर बोगस गि-हाईक हा पंचासह “पंचकर्मा बॉडी केअर” शॉप नं.९,समर्पण सी एच एस, यशवंत विवा टाउनशिप, कॅपिटल मॉल जवळ नालासोपारा पूर्व येथे गेले असता वेश्यादलाल शबाना ऊर्फ सोनम हीने बोगस गिऱ्हाईकास तीन महीला दाखवल्या व त्यामधुन तुम्ही पसंद करा व माझे कमिशन व वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन मला ठरल्याप्रमाणे पैसे दया असे सांगितल्यावर बोगस गिऱ्हाईक याने पोनि/पवार मॅडम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे एक महीला पसंद करुन छापा पंचनाम्यातील ठरल्याप्रमाणे तीस पैसे दिले असता बोगस गिऱ्हाईक याने पोलीस पथकास कन्फरमेशन इशारा दिला असता दोन पंचासह सदर ठिकाणी जावून छापा टाकला त्यामध्ये एक महीला दलाल आरोपीत नामे शबाना ऊर्फ सोनम शफीक शेख हीस ताब्यात घेतले. व तीन महीला पिडीत यांची वेश्याव्यवसाया पासुन सुटका केली आहे.

यातील वेश्यादलाल नामे शबाना ऊर्फ सोनम शफीक शेख वय २४ वर्षे रा.ए/४०४ ब्ल्यु हॅवेन,संयुक्त नगर,अलकापुरी नालासोपारा पूर्व ता.वसई जि.पालघर मुळ रा. दिल्ली हीने पिडीत महीलांना पैशाचे आमिष दाखवुन वेगवेगळया ग्राहकांना बोलावुन त्यांचेकडुन पैसे घेवुन पिडीत महीला यांना वेश्याव्यवसाय करण्यास लावते व वेश्यागमनाचा मोबदला व कमीशन मिळुन असे एकुण एका महीलेचे ४०००/-रु. घेते व त्यातील काही पैसे पिडीत महीलांना देत असते.

तरी सदर पिडीत महीला यांची वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून सुटका करून नमूद महीला दलाल आरोपीत हीस अटक करून आचोळे पोलीस ठाणे गु.रजि.नं. १७५/२०२४ भादविस कलम

३७०(१) सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ प्रमाणे आरोपीत शबाना ऊर्फ सोनम शफीक शेख हीचेवर गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उपआयुक्त श्री अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री बल्लाळ सो। यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार व सफौ/९६००५ गवई, पोहवा/०७०५५ शेटये, मपोहवा/०५००४ डोईफोडे, मपोशि/१६०९५ पाटील,चालक पोहवा/०७०६६ पागी, सर्व नेम.अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा विभाग यांनी केली आहे.